मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# ‘PCMC @50’ नागरिक सर्वेक्षणाची सुरुवात

## पिंपरी-चिंचवड महापालिकेने ‘पीसीएमसी @ 50’ मोहिमेंतर्गत सुरू केले नागरिक सर्वेक्षण

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ‘पीसीएमसी @ 50’ व्हिजन मोहिमेंतर्गत नागरिक सर्वेक्षणाची सुरुवात पिंपरी चिंचवड शहराच्या विविध विभागांमध्ये झाली आहे. स्वयंसहाय्यता गटांच्या २५० हून अधिक प्रशिक्षित महिलांमार्फत हे सर्वेक्षण करण्यात येत आहे. २०३२ मध्ये पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थापनेला ५० वर्ष पूर्ण होत आहेत. महापालिकेच्या या सुवर्ण महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहराच्या विकास धोरणासाठी जवळपास २० हजार नागरिकांचा फीडबॅक गोळा करणे, हे या सर्वेक्षणाचे उद्दिष्ट आहे.



पिंपरी चिंचवड महापालिका समाज विकास विभाग टाटा स्ट्राईव्हच्या सहकार्याने सक्षमा उपक्रमा अंतर्गत ही मोहिम राबविण्यात येत आहे. यासाठी महापालिकेचा सिटी ट्रान्सफॉर्मेशन उपक्रम (सीटीओ) सहकार्य करीत आहे. या सर्वेक्षणात निवासी व्यक्ती, व्यावसायिक आस्थापने आणि विविध संस्था येथील नागरिकांचा फीडबॅक गोळा केला जाणार आहे.

नागरिक या सर्वेक्षणात ऑनलाइन देखील सहभागी होऊ शकतात. महापालिकेच्या विविध विभाग कार्यालयांमध्ये आणि तसेच शहरातील विविध ठिकाणी याबाबत क्युआर कोड लावण्यात आले आहेत. हा कोड स्कॅन करून नागरिकांना सर्वेक्षणात ऑनलाइन सहभागी होता येईल. याशिवाय महापालिकेच्या संकेतस्थळाला भेट देऊन सर्वेक्षणात सहभागी होता येईल.

> “ पिंपरी चिंचवड शहराच्या भवितव्याला आकार देण्यासाठी ‘पीसीएमसी @ 50’ व्हिजन हा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या सर्वेक्षणात जास्तीतजास्त नागरिकांनी सहभागी व्हावे. सर्वेक्षणासाठी येणाऱ्या स्वयंसहाय्यता गटांच्या महिलांना सहकार्य करावे. तसेच सर्वेक्षण फॉर्म भरताना तुमचे योग्य मत नोंदवा. तुमचे मत आपल्या शहराच्या भवितव्यासाठी महत्त्वाचे आहे.
>
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका.


# छत्रपती संभाजी महाराजांच्या नावाने “पीआयईसीसी” ची ओळख!

## आमदार लांडगे यांच्या मागणीला प्रतिसाद : ‘पीएमआरडीए’ प्रशासनाचा सर्वसाधारण सभेत प्रस्ताव

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) च्या मोशी-बोऱ्हाडेवाडी येथे पेठ क्रमांक 5 व 8 मध्ये उभारण्यात आलेल्या पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व कन्व्हेंशन केंद्राला (PIECC) ला धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव देण्यात येणार आहे. तसा प्रस्ताव PMRDA च्या सर्वसाधारण सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे.

बोऱ्हाडेवाडी-मोशी येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा जगातील सर्वात उंच 140 फूटाचा “स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण” भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे.



पिंपरी-चिंचवडकरांसह शिव-शुंभू प्रेमींसाठी ही अभिमानाची बाब आहे. त्या अनुशंगाने याच परिसरात उभारलेले पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व कन्व्हेंन्शन केंद्राला धर्मवीरम्हसे यांना केली होती.

दरम्यान, महानगर आयुक्त योगेश म्हसे यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला असून, पेठ क्र. 5 व 8 मोशी येथील औद्योगिक प्रदर्शन केंद्र या आरक्षणाचे नामाभिधान पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व कन्व्हेंशन सेंटर, मोशी, पुणे. असे करण्यात आले आहे. या नावानुसार सदर प्रकल्पाचे प्राधिकरण कार्यालय व शासन अभिलेखी नोंदी असून, त्या प्रमाणे कामकाज करण्यात येते. त्यामुळे प्रकल्पाचे नावविस्ताराची केलेली मागणीबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहेत. त्या अनुशंगाने सदर प्रस्ताव तयार करुन प्राधिकरणाच्या सभेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल, असे महानगर आयुक्त योगेश म्हसे यांनी कळवले आहे.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली प्राधिकरणाची सर्वसाधारण सभा होते. त्या सभेत मान्यता मिळाल्यानंतर “हिंदूभूषण धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र” असा नामविस्तार होईल, असा विश्वास आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला आहे.

> “ अखंड हिंदूस्थानचे श्रद्धास्थान व स्फूर्तीस्थान धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रदर्शन केंद्राला द्यावे, अशी शिव-शुंभप्रेमींची भावना आहे. त्या अनुशंगाने प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सदर प्रस्तावाला मान्यता मिळेल, असा विश्वास आहे.
>
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# दीपक मानकर यांच्यावर गुन्हा दाखल

## अजित पवार गटाचे अध्यक्ष दीपक मानकर यांच्यावर बनावट कागदपत्रांप्रकरणी गुन्हा

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहराध्यक्षांच्या अडचणी वाढल्यात. शंतनू कुकडे प्रकरणात नाव आल्यानंतर पुणे शहराचे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष असलेले दीपक मानकर हे चर्चेत आले. याच दीपक मानकरांनी बनावट कागदपत्र सादर करून पोलिसांची दिशाभूल केल्याबद्दल त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलाय. अजित पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सत्तेमध्ये सहभागी आहे. अजित पवार हे उपमुख्यमंत्री आहेत आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री सुद्धा आहेत. अशातच पुणे शहराच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहर गुन्हा दाखल झाल्यानं पुणे शहराच्या राजकारणात मोठी चर्चा होऊ लागली आहे.

अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या अल्पसंख्यांक विभागाचा शंतनू कुकडे हा राज्य उपाध्यक्ष होता. या शंतनू कुकडेला पुणे पोलिसांनी काही महिलांच्या तक्रारीनंतर बलात्कार अटक केली होती. या संदर्भात पोलिसांनी शंतनू कुकडेची अधिक तपासणी केली असता त्याच्या बँक खात्यावरून शंतनू कुकडे आणि दीपक मानकर यांच्यात एक कोटी रुपयांची देवाणघेवाण झाल्याचं आढळून आलं.



त्यामुळे पोलिसांनी याबाबत दीपक मानकर यांना काही दिवसांपूर्वी चौकशीला बोलावलं होतं. यावेळी दीपक मानकर यांनी शंतनू कुकडे सोबत कोणतेही आर्थिक व्यवहार नसल्याचा दावा केला होता. तसंच या संदर्भात दीपक मानकर यांनी काही कागदपत्र पोलिसांसमोर सादर केली. पोलिसांनी मानकर यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची सत्यता तपासली आणि ती कागदपत्र बनावट असल्याचं त्यांना आढळून आलं. आणि इथेच दीपक मानकर यांच्या अडचणी खऱ्या अर्थानं सुरू झाल्या. त्यानंतर दीपक विरोधात बनावट कागदपत्र सादर करून पोलिसांची फसवणूक केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आलाय.

पुण्यातील समर्थ पोलीस ठाण्यात शंतनू कुकडेवर परदेशी महिलेवर बलात्कार केल्याचा गुन्हा दाखल आहे. याप्रकरणी शंतनू कुकडेला अटक केली होती. आणि त्यावेळी तपासा दरम्यान शंतनू कुकडे याच्या बँक खात्यावरून कोट्यावधी आर्थिक व्यवहार झाल्याचे पोलिसांना तपासा दरम्यान आढळून आलंय. आरोपी चंतनू कुकडेचा सीए रौनक जैन याच्या खात्यामधून मानकर पिता-पुत्रांच्या बँक खात्यामध्ये जवळपास पावणे दोन कोटी रुपये आल्याची माहिती आहे. त्यामुळे काही दिवसांपूर्वी याच शंतनू कुकडेच्या प्रकरणामध्ये दीपक मानकर यांची चौकशी झाली होती. आणि आता बनावट कागदपत्रांच्या साहाय्यानं जमीन व्यवहार केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आलाय.

### दीपक मानकर यांनी सर्व आरोप फेटाळले

» जैन याच्या बँक खात्यातून आमच्या बँक खात्यात पैसे आले. आमचा एका जमिनीचा व्यवहार आहे. तो याच्यासोबत झाला. आणि त्याची कायदेशीर इसार पावती देखील आहे. शंतनू कुकडे याचे वैयक्तिक जीवन आणि त्याचे आर्थिक व्यवहार याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. असं दीपक मानकर यांनी त्यावेळी म्हटलं होतं. दरम्यान आता याच प्रकरणामध्ये दीपक मानकर यांनी पोलिसांना जी कागदपत्र सादर केली आहेत. तीच बनावट असल्याचं पोलिसांच्या तपासात उघड झालंय. त्यामुळे पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली दीपक मानकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलाय.

# बांधकाम कामगारांना मदतीचा हात

## सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी क्रेडाई पुणेचा पुढाकार

**पुणे | प्रतिनिधी**

बांधकाम कामगारांसाठी केंद्रासह राज्य सरकारच्या अनेक योजना आहेत. या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचत नसल्याने ते त्यापासून वंचित राहतात. त्यामुळे क्रेडाई-पुणे मेट्रोच्या वतीने बांधकाम कामगारांना सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. गेल्या आर्थिक वर्षात हजारो बांधकाम कामगारांना यामुळे फायदा झाला आहे.

क्रेडाई-पुणे मेट्रोच्या कामगार कल्याण समितीमार्फत विविध उपक्रम राबवले जातात. त्यात कामगारांसाठी वैद्यकीय शिबिरे, कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी नोंदणी आणि



शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे या उपक्रमांचा समावेश आहे. गेल्या आर्थिक वर्षात (एप्रिल २०२४ ते मार्च २०२५) कालावधीत या योजनांचा हजारो कामगारांना फायदा झाला आहे. कामगार कल्याण समितीकडून गेल्या आर्थिक वर्षात इमारत व अन्य बांधकाम क्षेत्रातील १० हजार ३६२ कामगारांची नोंदणी करण्यात आली. यामुळे हे कामगार सरकारी योजनांसाठी पात्र ठरले. याचबरोबर आयुष्मान भारतअंतर्गत ४ हजार ५६० कामगारांची नोंदणी करण्यात आली. तसेच, ई-श्रम योजनेत १ हजार ७०९ कामगारांची नोंदणी करण्यात आली.

समितीकडून कामगारांसाठी इतर उपक्रमही राबविण्यात आले. त्यात १० हजार ५६० कामगारांना सुरक्षा साहित्याचे वाटप करण्यात आले. कामगारांच्या मुलांसाठी आरोग्य व पोषण सेवा योजना राबविण्यात आली. त्याचा फायदा एकूण २५ हजार ६०५ मुलांना झाला. याचबरोबर कामगारांच्या ७०० मुलांचे लसीकरण करण्यात आले. याबाबत कामगार कल्याण समितीचे संयोजक मिलिंद तलाठी म्हणाले की, आपण केवळ शहरे उभारत नाही, तर जीवन समृद्ध करीत आहोत. कामगारांच्या चेहऱ्यावर उमटलेले प्रत्येक हसू, त्यांच्या आत्मसन्मानाचे प्रत्येक पाऊलही सर्व उद्याची पायाभरणी आहे. प्रत्येक उंच इमारतीच्या मागे एक मूक नायक उभा असतो. अशा बांधकाम कामगारांना कल्याणासाठी उपाययोजना करण्यास क्रेडाईकडून प्राधान्य दिले जात आहे.

### आभार सप्ताहाचे आयोजन

» आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त क्रेडाईच्या वतीने १ ते ७ मेदरम्यान 'आभार सप्ताह' आयोजित करण्यात आला. या सप्ताहानिमित्त कुमार रिॲल्टी आणि क्रेडाईच्या वतीने हिंजवडी येथील मेगापोलिस प्रकल्पस्थळी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी कामगारांसाठी आरोग्य तपासणी आणि धनुर्वात लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले.

# प्रशासनाकडून पर्यावरणवाद्यांची मुस्कटदाबी

## मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यासाठी पोलिसांनी पर्यावरण रक्षकांना घेतले ताब्यात; मुळा, पवना आणि इंद्रायणी नदी बचाव समितीचे सदस्य संतप्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नियोजित दौऱ्यासाठी आले होते. त्याअनुषंगाने मुख्यमंत्री यांना काळे झेंडे दाखवणार असे विश्वसनीय वृत्त असल्याचे कारण देऊन मुळा, पवना, इंद्रायणी नदीसुधार प्रकल्पाच्या विरोधात जनआंदोलन करणारे पर्यावरणवाद्यांना विविध ठिकाणांहून पोलिस यंत्रणेने ताब्यात घेतले. या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनासाठी भूमिका घेतलेल्या सर्वसामान्य नागरिकांची मुस्कटदाबी केली जात असल्याबद्दल संताप व्यक्त केला जात आहे. पोलिस प्रशासनाच्या माध्यमातून नदी वाचवण्यासाठी आंदोलन करणाऱ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप पर्यावरणवाद्यांनी केला आहे.

या दौऱ्यात नदीसुधार प्रकल्पाला विरोध करणारे आंदोलक मुख्यमंत्र्यांना काळे झेंडे दाखवणार आहेत, अशी गोपणीय माहिती मिळाल्यामुळे या आंदोलकांना पोलीस ठाण्यात सकाळी १०.१० वाजता महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ६८, ६९ प्रमाणे ताब्यात घेण्यात आले होते. तसेच एमआयडीसी भोसरी पोलीस स्टेशन डायरी नोंद क्रं. ११/२०२५ वेळ १०/५५ वा. नोंद झाली आहे. तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियत कलम ६८, ६९ अन्वये १३.४५ वा नोटीस देऊन सोडून देण्यास आले. सदरची कारवाई कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून करण्यात आली असल्याचेही पोलीस प्रशासनाने म्हटले आहे. पिंपरी-चिंचवडच्या पोलीस आयुक्तांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे दिनांक २९/०४/२०२५ च्या आदेशान्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले होते. त्यानुसार कोणत्याही इसमाच्या चित्राची, नेत्यांच्या चित्राची, प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे, मोठ-मोठयाने घोषणा देणे, वाद्य वाजवणे, आदी कृतीस मनाई करण्यात आली. तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल असे कृत्य करु नये. आपण आपले मागण्यांकरीता सनदशीर मार्गाचा अवलंब करुन प्रशासनास सहकार्य करावे.



### सर्वसामान्य नागरिकांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न

» पिंपरी-चिंचवड शहरात महापालिकेच्यावतीने राबवण्यात येणाऱ्या नदीसुधार प्रकल्पाच्या विरोधात आंदोलन करणाऱ्या नागरिकांत आयटीयन्स, पत्रकार, लेखक, अभिनेते, पर्यावरणवाद्यांसह हजारो सर्वसामान्य नागरिकांचा सहभाग आहे. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने सर्वसामान्य जनतेनेच हे आंदोलन आता हातात घेतले आहे. त्याला कोणताही राजकीय रंग नाही. ही लोकचळवळ बनली असताना केवळ मुख्यमंत्र्यांसमोर सर्वसामान्य नागरिकांचा रोष दिसता कामा नये, यासाठी पोलीस प्रशासानाच्या माध्यमातून आमचा आवाज दडपण्याचा प्रयत्न केला जात असलयाचा आरोप पर्यावरणवाद्यांनी केला आहे.

### चुकीचे कारण देत वेठीस धरले

» महापालिकेच्या वतीने नदीसुधार प्रकल्पाच्या अनुषंगाने मुळा, पवना आणि इंद्रायणी नदी काठ विकासाचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यासाठी नदी काठावरील शेकडो झाडे तोडली आहेत. नदीपात्र अरुंद केले आहे. नदीत भराव आणि राडारोडा टाकला असल्याने त्याच्या विरोधात नदी बचाव कृती समितीच्या वतीने नागरिकांच्या पाठिंब्यावर महापालिका प्रशासनाच्या विरोधात जनआंदोलन उभे केले आहे. त्यामुळे प्रशासन आम्हाला या उद्देशापासून बाजूला करण्यासाठी आम्हाला काही तरी करणे देऊन बाजूला करण्याचे प्रयत्न करीत आहे. जर आम्हाला आंदोलन करायचे असते तर आम्ही त्यासाठी रीतसर परवानगी घेतली असती आणि नियमांमध्ये बसेल असे आंदोलन केले असते. मात्र आम्हाला समजलेल्या विश्वसनीय माहितीचे चुकीचे कारण पुढे करत आम्हाला पोलिस ठाण्यात बोलवून घेत वेठीस धरणे कितपत योग्य आहे असा सवाल पर्यावरणवादी यांनी केला आहे.

> आम्ही नदी बचावसाठी मुख्यमंत्री यांना मुंबई येथे रीतसर भेटलो होतो. त्यांनी आमचे म्हणणे ऐकून घेतले होते. त्यांच्यामुळे आम्हाला आयुक्तांबरोबर बोलण्याची परवानगी मिळाली होती. तर मग आम्ही आजच्या त्यांच्या कार्यक्रमासाठी का काळे झेंडे दाखवणार असा आमचा प्रश्न पोलिस प्रशासनाला आहे. सकाळी उचलल्यानंतर त्याबाबत नोटीस दाखवण्याची मागणी केली असता दोन तासांनी ती दाखवले जाते याचा आम्ही काय अर्थ घ्यायचा. आम्हाला पोलिस प्रशासन उचलून घेऊन गेल्यानंतर त्याच्यामुळे जर घरातील ज्येष्ठ नागरिकांना कोणता त्रास झाला तर त्याची जबाबदारी कोण घेणार.
>
> **- प्रशांत राऊळ, पर्यावरणवादी**

# पिंपरीतील मेट्रो स्थानकावरील अपूर्ण पुलामुळे हाल

## मेट्रोसेवा सुरु होऊन तीन वर्षे झाली असली, तरी पीसीएमसी मेट्रो स्थानकावरील एक महत्त्वाचा पादचारी पूल अद्यापही प्रवाशांना वापरता येण्याजोगा नाही.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात मेट्रोसेवा सुरु होऊन तीन वर्षे झाली असली, तरी पीसीएमसी मेट्रो स्थानकावरील एक महत्त्वाचा पादचारी पूल अद्यापही प्रवाशांना वापरता येण्याजोगा नाही. प्रवाशांच्या दृष्टीने ही प्रतीक्षा अधिक त्रासदायक ठरते आहे. महापालिका भवनासमोरील हा पूल केवळ अधांतरी स्थितीत राहिल्याने, प्रवाशांना अजूनही महामार्ग ओलांडण्याचा धोका पत्करावा लागत आहे.

पिंपरीतील पीसीएमसी मेट्रो स्थानक हे पिंपरी-चिंचवड शहराचे एक केंद्रबिंदू ठरले आहे. या ठिकाणी दररोज हजारो प्रवासी मेट्रोच्या माध्यमातून प्रवास करतात. या स्थानकातून आकुडी, चिंचवड, पुणावळे, रावेत, वाकड या भागात जाणाऱ्या आणि तिकडून येणाऱ्या प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे या ठिकाणी अत्यंत सुरक्षित आणि सुलभ पादचारी संपर्क असणे गरजेचे होते. त्याच अनुषंगाने या स्थानकासाठी चार पादचारी पूल मंजूर करण्यात आले होते. यापैकी दोन पूल प्रवाशांच्या सेवेत दाखल करण्यात आले आहेत. मात्र महापालिका मुख्यालयासमोरील पूल अद्यापही अपूर्ण स्थितीत आहे. या अपूर्ण पुलामुळे प्रवाशांना महामार्ग ओलांडताना अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे. या मार्गावर अवजड वाहतूक आणि जलदगती वाहनांची संख्याही लक्षणीय असल्याने, वाहनचालक आणि पादचाऱ्यांमध्ये नेहमीच तणावाची स्थिती निर्माण होते. विशेषतः सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळात शालेय विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक यांना जीव मुठीत धरून रस्ता पार करावा लागतो.



### प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे नागरी सुरक्षेचा प्रश्न

» एकीकडे पायवाटही उभी राहिलेली नसल्यामुळे आणि दुसरीकडे पूल नसल्याने नागरिकांपुढे कोणताही सुरक्षित पर्याय उरत नाही. महामेट्रोने या पूलाचे बांधकाम सुरू केल्याचे तीन वर्षांपूर्वी जाहीर केले होते. सुरुवातीस काही पिलर उभारण्यात आले, परंतु त्यानंतर कामाचा वेग कमी झाला. आतादेखील पूल अधांतरी स्थितीत असून जिन्याचे कामही पूर्ण झालेले नाही. नागरिकांनी अनेकवेळा या संदर्भात महामेट्रोकडे तक्रारी केल्या असून स्थानिक नगरसेवकांनीही पाठपुरावा केला आहे. मात्र ठोस कार्यवाही दिसून आलेली नाही. पीसीएमसी परिसरातील एक प्रवासी विशाल थोरात म्हणाले की, प्रत्येक दिवशी आम्हाला महामार्ग ओलांडताना जीव गहाण ठेवावा लागतो.

# छत्रपती कारखाना येणाऱ्या निवडणुकांचा ठरणार ट्रेलर

## जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी जुने सात गट लागले कामाला

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचा घोळ मिटला असून, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका येणाऱ्या चारच महिन्यात पार पडतील, असे स्पष्ट झाले आहे. तालुक्यातील सात जिल्हा परिषद गटातील नेहमीचेच कलाकार तयारीस लागलेले दिसून येत आहेत, असे असले तरी देखील याच तालुक्यातील छत्रपती सहकारी साखर कारखान्याची पंचवार्षिक निवडणूक लागली असल्याने व खुद्द राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्वतः लक्ष देऊन, एक बलदंड पॅनल उभे केले आहे. त्यामुळे या छत्रपती साखर कारखान्याच्या निवडणुकीचा निकाल येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा, ट्रेलर असणार का? अशी चर्चा रंगू लागली आहे.

इंदापूर तालुक्यात कोणत्या निवडणुकीला काय होईल, हे कोणत्याही राजकीय विश्लेषकाला सांगता येत नाही. कारण येथील जनता जनार्दन, अत्यंत संवेदनशील हुशार असल्यामुळे, नुकत्याच झालेल्या लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकांत निकाल समोर आले. या तालुक्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विचाराची मोठी मांड आहे. राज्याच्या सत्तेत उपमुख्यमंत्री अजित पवार असल्याने प्रत्येक गटातील कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या जिद्दीने, राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्या मार्गदर्शनाखाली विकासकामे करताना दिसत आहेत. छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन अविनाश घोलप यांनी व त्यांच्या सहकार्यांनी छत्रपती कारखान्यात उभे राहिलेले पॅनल यंदा जनतेचा किती आशीर्वाद मिळवते. यावर देखील या भागातील दोन जिल्हा परिषद गटांचा विषय आहे.

त्याचप्रमाणे माजी सहकार मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाचे नेते हर्षवर्धन पाटील यांनी मोठी राजकीय अडचण असताना देखील, नीरा भीमा सहकारी साखर कारखाना बिनविरोध करत आपली सहकार क्षेत्राशी असलेली नाळ पुन्हा सिद्ध केलेली आहे. सत्तेत नसल्यामुळे हर्षवर्धन पाटील यांच्या कामाचा वेग दिसत नसला तरीही, तालुक्यातील सात ही जिल्हा परिषद मतदार संघात कार्यकर्त्यांचे टीमवर्क व जाळे मोठे आहे. सन 2014 पासून हर्षवर्धन पाटील आमदार नसले तरी देखील त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेवरील आपला करिष्मा अद्यापपर्यंत जाऊ दिला नाही; मात्र काही दिवसातच, जिल्हा परिषद, पंचायत समिती नगरपरिषद, ग्रामपंचायत यांच्या निवडणुका होणार आहेत. यामध्ये हर्षवर्धन पाटील कशी राजकीय खेळी खेळणार याकडे लक्ष लागले आहे.

याउलट क्रीडा मंत्री म्हणून अत्यंत चांगली काम करत असणारे मंत्री दत्तात्रय भरणे यांनी गावोगावी विकासकामे करण्याची चळवळ मात्र वेगाने वाढवलेली दिसते आहे. सामान्य जनतेची नाळ कसल्याही परिस्थितीत तुटू नये. राज्याची जबाबदारी असतानाही तसेच वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री पद असतानाही, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे आठवड्यातील काही दिवस, आपले इंदापूर तालुक्यासाठी देत आहेत. आरोग्याच्या विषयावर मोठे काम मोठी मदत क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे करताना दिसत आहेत.



### राजकीय गणितांचा कारखान्यांवर परिणाम नाही

» या तालुक्यातील सहकारी तत्त्वावर चालणारे सहकारी साखर कारखाने आहेत. यामधील नीरा भीमा व कर्मयोगी साखर कारखाना माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या नेतृत्वाखाली आहे. तर उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती सहकारी साखर कारखाना आहे. या वीस पंचवीस वर्षात अनेक राजकीय गणिते बदलली, मात्र या तीन कारखान्यांमध्ये कोणताही बदल झालेला अद्यापी दिसला नाही.

### प्रवीण माने कोणाकडे?

» अपक्ष विधानसभा लढवणारे प्रवीण माने हे भारतीय जनता पार्टी जाणार का? किंवा येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका हर्षवर्धन पाटील यांच्या समवेत रणांगणात उडी घेणार, हे आज तरी कोणाला सांगता येणार नाही. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थेत, ज्यांच्याकडे प्रवीण माने त्यांची सरशी होईल, असे बोलले जात आहे.

### नगरपरिषदेसाठी रणनीती

» इंदापूर नगर परिषदेच्या बाबतीत आज बाहेरून हालचाली चाललेल्या दिसत नसतील. तरीदेखील अंतर्गत नगरपालिका निवडणुकीची बांधणी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर तसेच कर्मयोगी शंकरराव पाटील सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन भरत शहा यांची चाललेली दिसते. तर नागरी संघर्ष समितीच्या माध्यमातून, जनतेचे प्रश्न या संदर्भात माजी उपनगराध्यक्ष प्राध्यापक कृष्णा ताटे यांनी आपली टीम सक्रिय ठेवली आहे.

# ग्रामपंचायत निवडणुकीचे बिगुल कधी वाजणार?

## मुदत संपून दीड दोन वर्षे झाली असल्याने ग्रामपंचायतवर सध्या प्रशासक काम पाहत आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यातील मुदत संपलेल्या वीस ग्रामपंचायतीसाठी वॉर्डातील आरक्षणाची सोडत तसेच सरपंच आरक्षण सोडत नुकतीच झाली आहे. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीच्या मतदानासाठी मतदार याद्याही प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत; परंतु निवडणूक कधी लागणार, असा प्रश्न इच्छुक उमेदवारांना पडला आहे.

आरक्षण सोडत झाल्यामुळे व प्रत्येक ग्रामपंचायतीला सरपंच कोण होणार हे सर्व जाहीर झाल्यामुळे ग्रामपंचायतीच्या सदस्य, सरपंच निवडणुकीसाठी अनेकांनी कंबर कसली आहे. काहीजण गुडघ्याला बाशिंग बांधून तयार झाले आहेत. गावातील प्रत्येक वाडी, वस्त्यांवर प्रस्तावित उमेदवारांनी मतदारांच्या भेटीगाठी सुरू केल्या आहेत. ज्या महिलांना सरपंच पदाची संधी आहे त्या महिलांचे पतीराजही आघाडीवर आहेत. मुदत संपून दीड दोन वर्षे झाली असल्याने ग्रामपंचायतवर सध्या प्रशासक काम पाहत आहेत.

त्यामुळे इंदापूर तालुक्यातील वीस ग्रामपंचायतीच्या निवडणुका प्रत्यक्षात कधी पार पडणार याकडे सर्वांचे लक्ष आहे. लोकसभा निवडणूक पूर्वी ग्रामपंचायत निवडणूक होईल, अशी अटकळ बांधली जात होती; परंतु लोकसभा निवडणुकीचे कारण देत निवडणुका लांबणीवर गेल्या. त्यामुळे इच्छुकांनी केलेल्या तयारीवर पाणी फिरले.

आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या ग्रामपंचायतीचा पुढारी आपण असलो पाहिजे. ती ग्रामपंचायत आपल्याच गटाच्या ताब्यात पाहिजे अशी राजकीय पुढाऱ्यांची, नेत्यांची, कार्यकर्त्यांची इच्छा असते.




### एकेक मत महत्त्वाचे

» ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत एका मताला ही महत्त्व असते. एका मतानेही उमेदवार विजयी, पराभूत होत असतो. म्हणून एका, एका मतांची आकडेवारी महत्त्वाची असते. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या निवडणुकीला विशेष महत्त्व आहे. इंदापूर तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या सरपंच पद व वार्डातील आरक्षणाची सोडत निघाल्यामुळे गावातील पदाधिकारी, कार्यकर्ते आतापासूनच प्रचार करू लागले आहेत. दिवसा, रात्री मतदारांच्या गाठीभेटी घेत आहेत. बैठकाही घेत आहे.

### हात आखडता

» गेली दोन अडीच वर्षांपासून लांबलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती, नगरपरिषद निवडणुका आधी होणार की ग्रामपंचायत? याची खात्री नसल्याने इच्छुक मात्र खर्चापासून हात आखडता घेत असल्याचे दिसून येत आहे.